जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३११ दिनांक - ०६/०८/२०२४**

येरवडा पोलिस स्टेशन पुणे शहर

## अंधा-या रात्री दुचाकी चालकाला चिरडणा-या ट्रक चालकाचा शिताफीने शोध घेऊन येरवडा पोलीस तपास पथकाने केले जेरबंद

दिनांक २०/०१/२०२४ रोजी ०४/३० वाजता कल्याणी नगर जंक्शन,पुणे नगर रोड येरवडा पुणे येथे एका दुचाकी वरुन जाणारे दोघांना एका भरधाव वेगाने येणारे कंन्टेनर चालकाने पाठी मागुन धडक दिलेली होती.त्यामध्ये सदर दुचाकीचे पाठीमागे बसलेला इसम नामे इशान सुनिल करवडे,वय ३४ वर्षे हा तरुण मयत झालेला होता.व चालक गौरव खंडारे जखमी झालेला होता. त्यानंतर सदर कंन्टेनर चालक तेथे न थांबता तेथुन पळुन गेलेला होता.त्याबाबत येरवडा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३३/२०२४ भादवि ३०४ (अ),२७९,३३७,४२७ मो.वा.का.१८४,११९/१७७,१३२(१)(क) प्रमाणे नोंद करण्यात आलेला होता.

सदर ट्रक/कंन्टेनर चालकाचा शोध घेत असताना येरवडा पोलीस स्टेशन तपास पथकातील पोलीस अंमलदार अनिल शिंदे यांनी जवळपास १०० चे आसपास सी सी टी व्हि कॅमे-यांचे फुटेज तपासले होते.त्यामध्ये सदरचा अपघात हा एम.एच.४६ ए.आर.४८३६ वरील ट्रक/कंन्टेनर चालकाने अपघात केलेचे व त्यानंतर सदर कंन्टेनर चालक पळुन गेलेला असलेचे सी सी टी व्हि कॅमे-यामध्ये दिसुन आले होते.त्यानंतर पोलीसांनी सदर कंन्टेनर चालकाचे मालकाचा शोध घेऊन, अपघाता दिवशी सदर कंन्टेनर चालविणारा चालक आरोपी नामे मोहंमद अशीम हातीम अन्सारी,वय ३४ वर्षे,रा.कुन्हारा कला,जि.हजारी बाग,झारखंड राज्य हा असले बाबत रजिस्ट्रचे नोंदी वरुन निष्पन्न झालेने,त्यास अटक केलेली आहे.गुन्हयाचा पढील तपास पोउपनि स्वप्निल पाटिल करत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ ४,श्री.विजयकुमार मगर, मा.सहा. पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,श्रीमती प्रांजली सोनवणे, वरिष्ठ पो.निरीक्षक येरवडा पो.स्टे.श्री.रविंद्र शेळके, पो.नि.(गुन्हे)छगन कापसे, पो.नि.(गुन्हे),पल्लवी मेहेर,यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोउपनि स्वप्निल पाटील, पो.अमंलदार दत्ता शिंदे,तुषार खराडे,किरण घुटे,सागर जगदाळे, अनिल शिंदे,सुरज ओंबासे,दत्तात्रय शिंदे,प्रशांत कांबळे,सुशांत भोसले,विठ्ठल घुले,विशाल निलख यांनी केलेली आहे.